"झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्मुलन आदेश"

ज्याअर्थी पुणे व पिंपरी चिंचवड शहरांसाठी महाराष्ट्र शासनाचे गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्रमांक झोपुयो - २००४/प्र.क्र. २१३/झोपसू - १ महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ अ (१) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती करणेत आलेली आहे. उक्त अधिसूचनेतील (३) नुसार आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना उक्त प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून प्राधिकृत करणेत आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, आमच्यापुढे उक्त अधिनियमाचे कलम ३ ड (१) अन्वये "हडपसर स.क्र.२२६अ/१/१ पैकी कदमवस्ती, पुणे" येथील गलिच्छवस्ती क्षेत्रापैकी २२८०.५८ चौ.मी. क्षेत्रावर "झोपडपट्टी पुनर्वसन योजना" राबविणे व त्यासाठी अस्तीत्वातील सर्व झोपडया/बांधकामे पाडण्यासाठी "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्मुलन आदेश" द्यावा अगर कसे? यासाठी प्रस्ताव सादर आहे.

सदर क्षेत्राचा तपशील खालील प्रमाणे आहे....

(अ) हडपसर स.क्र.२२६अ/१/१ पैकी कदमवस्ती, पुणे
क्षेत्र :- ४०००.०० चौ.मी.

घोषीत दिनांक ६ जानेवारी, २०००
राजपत्र पान क्रमांक ३०.

योजनेच्या चतु:सिमा :-

| | | |
|---|---|---|
| पूर्वेस | :- | स.क्र.२२६अ पैकी स.क्र.२२४, २२५. |
| दक्षिणेस | :- | लागू पुणे-सोलापूर रस्ता. |
| पश्चिमेस | :- | स.क्र.२२६ अ (पै.) (पी.एम.टी.डेपो) |
| उत्तरेस | :- | स.क्र.२२६अ पैकी. |

| | | |
|---|---|---|
| • एकूण योजनेचे क्षेत्र | : | ४०००.०० चौ.मी. |
| • एकूण झोपडयांची संख्या | : | ५४ |
| • एकूण जागेवर प्रत्यक्ष वास्तव्यास असलेल्या झोपडयांची संख्या | : | ५४ |
| • पात्र निवासी झोपडयांची संख्या | : | ३२ |
| • पात्र बिगर निवासी झोपडयांची संख्या | : | ०१ (एक) |
| • एकूण पात्र निवासी + बिगर निवासी झोपडयांची संख्या | : | ३३ |
| • अपात्र | : | २१ |

आणि ज्याअर्थी आमच्याकडे संबंधित जमिन मालकांनी विकसकामार्फत दाखल केलेल्या ''पुनर्वसन योजना'' प्रस्तावात योजनेचा तपशिल विहित नमुन्यानुसार सादर केलेला असून सदर ठिकाणी ''झोपडपट्टी पुनर्वसन योजना'' राबविणे आवश्यक व योग्य असल्याचे आमचे मत झालेले आहे.

त्याअर्थी उक्त अधिनियमाचे कलम ३ (ड) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी. डॉ. नितिन करीर मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे सदरील क्षेत्र ''झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र'' म्हणून घोषित करून ''झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्मुलन आदेश'' खालील अटींवर पारित करित आहे.

१) प्रस्तुतचा आदेश पारित झालेनंतर विकसकांनी २ (दोन) महिने मुदतीच्या आत संक्रमण शिबीराचे व योजनेचे नकाशे मंजूर करून घ्यावयाचे आहेत.

२) विकसकाने पुनर्वसन योजनेचे काम चालू करणेपुर्वी विस्थापित होणाऱ्या लाभार्थींची तात्पुरती रहाण्याची व्यवस्था स्वखर्चाने करावयाची आहे. लाभार्थींच्या तात्पुरत्या रहाण्याच्या व्यवस्थेसाठी बांधण्यांत येणाऱ्या संक्रमण शिबीरात लाईट, पाणी, सांडपाण्याची सोय, स्वच्छतागृहे आदी आवश्यक बाबींची सुविधा विकसकाने करून दयावयाची आहे.

३) प्रस्तुत योजनेच्या नकाशे मंजुरीनंतर विकसक ३ (तीन) महिने मुदतीच्या आत ''पात्र लाभार्थ्यांना संक्रमण शिबीरात स्थलांतर करेल व पुनर्वसन क्षेत्रात विनिर्दिष्ट करणेत आलेली सर्व झोपड्या / बांधकामे पाडून टाकील व जागा रिकामी करेल.''

४) विकसकांनी प्रस्तुतच्या योजनेमध्ये लाभार्थ्यांचे पुनर्वसन पक्क्या गाळ्यांमध्ये नकाशे मंजूर दिनांकापासून ४ (चार) वर्षांचे कालावधीत पूर्ण करावयाचे आहे.

५) विकसकाने झोपडपट्टी पुनर्वसन इमारतीचे बांधकाम खर्चाच्या १% (एक टक्का) रक्कमेची ४ (चार) वर्षे मुदतीची मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे नावे बँक गॅरंटी नकाशे मंजुरीपूर्वी दाखल करावयाची आहे. विहित मुदतीत बांधकाम पुर्ण न केलयास अथवा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी झो.पु.प्रा. पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचेकडून मुदतवाढ न घेतल्यास बँक गॅरंटी ''एनकॅश'' करणेत येईल, योजनेस मुदतवाढ देणेबाबतचा निर्णय मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांचा अंतिम राहील.

६) झोपडपट्टी पुनर्वसन इमारतीमध्ये विस्थापित होणाऱ्या लाभार्थींसाठी बांधलेल्या गाळयांचा ताबा विकसकाने नकाशे मंजुर दिनांकापासून ४ (चार) वर्ष कालावधीत दिला पाहिजे. यास विलंब होणाऱ्या प्रत्येक महिन्यासाठी प्रत्येक गाळयासाठी र.रू. ३०००/- (तीन हजार) इतका विलंब आकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांचेकडे विकसकाने भरावा लागेल.

७) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमावलींनुसार योजनेअंतर्गत आवश्यक ते सर्व कार्य विकसकाने करणे आवश्यक आहे. तसेच सदर नियमावलींचे तरतूदी व अटी बंधनकारक राहतील.

डॉ. नितीन करीर
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.